
साहित्य प्रतिष्ठान
किल्ले पुरंदर

# दुर्ग दुर्गट भारी

# पुस्तक सहावे

## पुरंदर आणि वज्रगड

## पुरंदर आणि वज्रगड

संपादक – नचिकेत जोशी

मांडणी - सजावट – *Last Bench Designes*

प्रथमावृत्ती – १ मार्च २०१२

*ही ई-पुस्तिका विनामूल्य वितरणासाठी असून कोणत्याही स्वरूपात हिची विक्री करण्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.*

©२०१२

ई साहित्य प्रतिष्ठान
जी ११०२, ईटर्निटी
मॅरेथॉन चौक
ठाणे - ४००६०४

# अर्पणपत्रिका



मराठी साम्राज्याचा उदयास्त पाहिलेल्या
पुरंदर -वज्रगडाच्या द-याखो-यास...

# अनुक्रम


- ✓ आडवाटांचे देणे: नचिकेत जोशी
- ✓ प्रस्तावना
- ✓ भौगोलिक स्थान व जाण्याचे मार्ग
- ✓ इतिहासाचा मागोवा
- ✓ गडाचा फेरफटका
- ✓ ट्रेकर्ससाठी उपयुक्त माहिती
- ✓ ऋणनिर्देश

# आडवाटांचे देणे

नमस्कार दोस्तहो!!

रोजच्या धावपळीच्या आयुष्यातून निवांतपणा शोधत डोंगरदऱ्या पालथ्या घालायला सुरुवात करून तुम्हाला अनेक वर्षं झाली असतील. अस्सल ट्रेकरची वर्णने वाचून त्यानुसार स्वतःला त्यात बसवण्याचा प्रयत्नही करून झाला असेल. मनात आलं की पाठीवर (कायम भरून तयार असलेली) सॅक टाकून भटकणं आता सवयीचं झालं असेल. सगळं जग क्रिकेट मॅच किंवा लग्नसमारंभ अशा मोहमयी गोष्टींत अडकले होते, किंवा थिएटरमधल्या उबदार खुर्च्यांवर बसून थंडगार वातावरणात, अगदी जवळ बसून (कुणाच्या हा प्रश्न तुम्हाला पडला नसणार याची आम्हाला खात्री आहे) वेळ घालवत होते, तेव्हा आपण स्वतः मात्र काय केलं होतं ते आठवतंय ना?

उजाडण्याची वाट बघत रेल्वे प्लॅटफ़ॉर्मवर रात्र काढली होती, वाटेतल्या एखाद्या दगडावरच पाठ टेकवली होतो, सूर्योदय-सूर्यास्ताचे फोटो घ्यायला छाती फुटेपर्यंत कड्याच्या दिशेने धावला होतो, बाहेर पडणाऱ्या पावसाच्या आणि रातकिड्यांच्या किरकिऱ्या म्युझिकच्या साथीने गुहेत ट्रेकी गाण्यांची मैफल भरवली होती. अंधारात, पाऊस तोंडावर झेलत राजांचे मावळे असल्यागत नदी-नाले-चिखलगाळ तुडवला होता (आणि मुक्कामाला पोहोचलो तेव्हा पायातून बूट शेवटी ओढून काढावे लागले होते!)."घरी आराम करायचं सोडून इथे मरायला यायला कुणी सांगितलं होतं" हा प्रश्न जेव्हा जेव्हा पडला होता तेव्हा पुढच्याच वळणावर एखाद्या झऱ्याने, एखाद्या बुलबुल-ससाण्याच्या शर्यतीने, एखाद्या नाजूक फुलाने किंवा आकाशातल्या नक्षत्रांच्या सड्याने त्याचं उत्तर परस्पर देऊन टाकलं होतं.(पुढे पुढे मात्र हा प्रश्न कधी पडलाच नाही!) कुठल्याही ट्रेकमध्ये मिसळ-पाव खाल्ला नाही आणि एकदा तरी निसर्गाच्या सान्निध्यात "दान" केलं नाही तर ट्रेक निष्फळ ठरतो, तसेच ट्रेकमध्ये नैसर्गिक पाणीसाठे सोडून इतरत्र आंघोळ करणे हे पाप असते या विचारांवर निष्ठा ठेऊन राजांच्या जयघोषात कधी तोरणा-राजगड, तर कधी रतनगड-हरिश्चंद्रगड, कधी पन्हाळगड-विशाळगड तर कधी खांडस-भीमाशंकर

अशा वाऱ्या केल्या होत्या! (आणि फावल्या वेळात ट्रेकिंगने आम्हाला काय दिलं, किंवा मी ट्रेक का करतो अशा चर्चांमध्येही सहभागी झालो होतो!)

शहरातल्या रंगीबेरंगी दुनियेपेक्षा सह्याद्रीच्या सहवासातली रंगाची दुनिया अधिक मोहक आणि अस्सल आहे हे आपण केव्हाच स्वतःशी कबूल केलं आहे! आणि म्हणूनच एखादा चित्रपट पुन्हा पुन्हा बघावा तसं दर उन्हाळा-पावसाळा-हिवाळ्यात त्याच ओढीने आजही तेच किल्ले, तेच उतार, तेच बुरूज, तेच दरवाजे, त्याच कातळ-कपारी, त्याच अवघड पायवाटा आपण तुडवत असतो. अर्थात "सर्व प्रकारचे विरोध" (सूज्ञांस अधिक सांगणे नलगे!) मोडून काढून हे करावं लागतं हे खरंच! पण "हे कार्य" व्हावे ही तो श्रींचीच इच्छा!! कदाचित या ट्रेकिंगमुळेच आपण दैनंदिन जीवनातसुद्धा ट्रेकरच्या खाक्यानेच वागतो. कचरा इकडे-तिकडे टाकत नाही, पाणी जपून वापरतो, खिशात सदैव एक टॉर्च घेऊन फिरतो, कशाशीही काहीही तोंडी लावून खाऊ शकतो, कुठेही adjust करू शकतो, इतर पर्यटनस्थळांच्या ठिकाणी चाललेला थिल्लरपणा पाहून आपलं रक्त खवळतं इ. इ.

"दुर्ग दुर्गट भारी" या नव्या ई-पुस्तकांच्या मालिकेत आम्ही आपल्यासोबत करणार आहोत महाराष्ट्रातल्या परिचित-अपरिचित गडकोटांची ई-यात्रा! आपण नवखे असाल तर मार्गदर्शक म्हणून आम्ही आपल्या सोबत असू आणि अट्टल भटके असाल तर आपल्यासाठी ही जुन्या सदाबहार आठवणींची यात्रा असेल. एका पुस्तिकेत एक-दोन किल्ले, त्यांची ऐतिहासिक, भौगोलिक माहिती, वैशिष्ट्ये, प्रवासाचे तपशील इ सर्व माहितीने परिपूर्ण अशी ही मालिका असेल. दुर्गभ्रमंतीचं एक रेकनर म्हणूया हवंतर! :)

आपल्यासारख्या अट्टल भटक्यांच्या स्वागताला आडवाटाही सजवून सदैव तयार असणाऱ्या आपल्या लाडक्या सह्याद्रीमधल्या दुर्गभ्रमंतीला - चला, निघूया!

- नचिकेत जोशी

(संपादक, दुर्ग दुर्गट भारी)

# प्रस्तावना

नमस्कार दोस्तहो!

पुरान् दारयती इति पुरंदरः.. (शत्रुची) नगरे उध्वस्त करतो तो पुरंदर म्हणजे इंद्र! सासवडजवळील बलाढ्य पुरंदर दुर्गाचं हे असं सार्थ नामकरण आहे. इंद्राचं अस्त्र म्हणजे वज्र! पुरंदर दुर्गाचा उपदुर्ग असलेला वज्रगड उर्फ रुद्रमाळ हाही तसाच बलवान. पुरंदरच्या पायथ्याशी असलेल्या 'नारायणपूर' या गांवातील नारायणाचं मंदीर हजार वर्षांपूर्वीचं आहे.

राष्ट्रकूट- यादवांच्या काळात हे भरभराटीला असलेलं शहर होतं. कदाचित या शहराच्या रक्षणासाठीच पुरंदर दुर्गाची बांधणी झाली असावी. शिवशाहीतील काही महत्त्वाची इतिहासपाने पुरंदरच्या साक्षीने लिहिली गेली आहेत. दुर्ग पुरंदर आणि वज्रगड ही दुर्गजोडी शिवशाहीतील एका मोठ्या युध्दाचे केंद्र आहे. इतिहासात अजरामर झालेल्या मुरारबाजी देशपांडे आणि त्यांचे मावळे यांच्या लखलखत्या पराक्रमाचा आणि नंतर शिवराय व मिर्झाराजे जयसिंग यांच्यात झालेल्या स्वराज्यासाठी मानहानीकारक तहाचा पुरंदर दुर्ग साक्षीदार आहे.

शिवरायांचे थोरले पुत्र संभाजीराजांची तसेच पेशवाईतील सवाई माधवरावांचीही ही जन्मभूमी आहे.

अल्याड जेजुरी पल्याड सोनोरी मध्येच वाहते कऱ्हा !
पुरंदर शोभतो शिवशाहीचा तुरा !!

असं सार्थ वर्णन असलेल्या पुरंदर दुर्गाला, सह्यभूमीत रहाणार्या प्रत्येकाने भेट द्यायलाच हवी. मुरारबाजींच्या पुतळ्यासमोर २ घटका उभं राहून त्यांचा याच ठिकाणावरील पराक्रम मनांत ठासून घ्यायला हवा. या बलाढ्य दुर्ग जोडगोळीव्यतिरिक्त या परिसरांत, सोपानदेवांची समाधी असलेलं सासवड, दिवे घाटातील प्रसिध्द जाधवगढी, महाराष्ट्रात बांधला गेलेला
शेवटचा गिरीदुर्ग सोनोरीचा मल्हारगड या स्थानांनाही भेटी देता येतील.
...पण पहिला मान आहे तो फक्त दुर्ग पुरंदराचा..

# भौगोलिक स्थान व जाण्याचे मार्ग

अक्षांश-रेखांश - १८.२८ अंश अक्षांश ७४.३३ अंश रेखांश
उंची - १३६३ मी, (४४७२ फूट (समुद्रसपाटीपासून))
दुर्गप्रकार § गिरीदुर्ग
श्रेणी § सोपी
सह्याद्रीच्या दक्षिणोत्तर पसरलेल्या मूळ रांगेतून काही फाटे पूर्व दिशेकडे फुटले आहेत. त्यापैकी एका फाटावर सिंहगड आहे. तोच फाटा तसाच पूर्वेकडे अदमासे २४ कि. मी. धावून भुलेश्र्वर जवळ लोप पावतो. याच डोंगररांगेवर पुरंदर, वज्रगड वसलेला आहे. कात्रज घाट, बापदेव घाट, दिवे घाट हे तीन घाट ओलांडून पुरंदरच्या पायथ्याशी जाता येते. किल्ल्याला चौफेर माच्या आहेत. किल्ल्याचे स्थान व वर स्थित आहे.
शेजारीपाजारी -
किल्ला पुण्याच्या आग्रेय दिशेला अंदाजे २० मैलांवर तर सासवडच्या नैॠत्येला ६ मैलांवर आहे. गडाच्या पूर्वेला बहुतांशी प्रदेश सपाट आहे तर पश्चिमेला डोंगराळ प्रदेश आहे. वायव्येला १३-१४ मैलांवर सिंहगड आहे तर पश्चिमेला १९-२० मैलांवर राजगड आहे. पुरंदर किल्ला तसा विस्ताराने मोठा आहे. किल्ला मजबूत असून बचावाला जागा उत्तम आहे. गडावर मोठी शिबंदी राहू शकते. दारूगोळा व धान्याचा मोठा साठा करून गड दीर्घकाळ लढवता येऊ शकत असे. एक बाजू सोडली तर गडाच्या इतर सर्व बाजू दुर्गम आहेत. गडावरून सभोवारच्या प्रदेशावर बारीक नजर ठेवता येते.

जाण्याचे मार्ग
१) पुण्याहून : पुण्याहून ३० कि.मी अंतरावर असणा-या सासवड या गावी यावे. सासवड ते नारायणपूर ही अशी एस.टी सेवा देखील उपलब्ध आहे. नारायणपूर हे किल्ल्याच्या पायथ्याचे गाव आहे. गावातूनच गाडी रस्ता थेट किल्ल्या पर्यंत गेलेला आहे. पुणे ते नारायणपूर अशी बस सेवा देखील उपलब्ध आहे.

नारायणपूर गावातून गडावर जाण्यास दोन मार्ग आहे. एक म्हणजे गाडी रस्ता. या रस्त्याने गड गाठण्यास २ तास पुरतात तर दुसरी म्हणजे जंगलातून जाणारी पायवाट.

या पायवाटेने एक तासात आपण पुरंदर माचीवरच्या बिनीदरवाज्यापाशी पोहचतो

२) सासवडहून: किल्ल्यावर जाणारी दुसरी वाट जरा आडमार्गाची आहे. सासवडहून सासवड ६ भोर गाडी पकडावी. या गाडीने नारायणपूर गावाच्या पुढे असणा-या -पुरंदर घाटमाथा° या थांब्यावर उतरावे. हा घाटमाथा म्हणजे पुरंदर किल्ला आणि समोर असणा-या सूर्यपर्वत यामधील खिंड होय. या थांब्यावर उतरल्यावर समोरच डोंगरावर एक दोन घरे दिसतात. या घरामागूनच एक पायवाट डावीकडे वर जाते. ही वाट पुढे गाडी रस्त्याला जाऊन मिळते. या वाटेने पाऊण तासात पुरंदर माचीवरील बिनीदरवाजा गाठता येतो.
राहण्याची सोय : किल्ल्यावर मिलिटरीचे बंगले आहेत. यामध्ये राहण्याची सोय होऊ शकते. मात्र त्यासाठी तेथे असणाऱ्या त्यांच्या ऑफिसरची परवानगी घेणे आवश्यक आहे
जेवणाची सोय : आपण स्वतः करावी.
पाण्याची सोय : बारामही पिण्याचे पाणी उपलब्ध आहे.
जाण्यासाठी लागणारा वेळ: पायथ्यापासून १ तास.

# मागोवा इतिहासाचा

अल्याड जेजुरी पल्याड सोनोरी मध्ये वाहते कऱ्हा पुरंदर शोभती शिवशाहीचा तुरा ।
असे पुरंदर किल्ल्याचे वर्णन केलेले आढळते. पुरंदरच्या पायथ्याशी नारायणपूर नावाचे गाव आहे. या गावात यादवकालीन धाटणीचे महादेवाचे मंदिर आहे. यावरून हा किल्ला साधारण १००० ते १२०० वर्षांपूर्वीचा आहे असे अनुमान निघते.

पुरंदर म्हणजे इंद्र. ज्याप्रमाणे इंद्राचे स्थान बलाढ तसाच हा पुरंदर. पुराणात या डोंगराचे नाव आहे -इंद्रनील पर्वत°. हनुमंताने द्रोणागिरी उचलून नेत असताना त्या पर्वताचा काही भाग खाली पडला, तोच हा इंद्रनील पर्वत. बहामनीकाळी बेदरचे चंद्रसंपत देशपांडे यांनी बहामनी शासनाच्या वतीने पुरंदर ताब्यात घेतला. त्यांनी पुरंदरच्या

पुनर्निर्माणास प्रारंभ केला. त्याच घराण्यातील महादजी निळकण्ठ याने कसोशीने हे काम पूर्ण केले. येथील शेंदर्‍या बुरूज बांधताना तो सारखा ढासळत असे. तेव्हा बहिरनाक सोननाक याने आपला पुत्र नाथनाक आणि सून देवकाई अशी दोन मुले त्यात गाडण्यासाठी दिली. त्यांचा बळी घेतल्यावरच हा बुरूज उभा राहिला. हा किल्ला सन १४८९ च्या सुमारास निजामशाही सरदार मलिक अहंमद याने जिंकून घेतला. पुढे शके १५५० मध्ये तो आदिलशाहीत आला.

इ. स. १६४९ मध्ये आदिलशहाने शहाजीराजांना कैदेत टाकले. याच वेळी शिवाजी महाराजांनी अनेक आदिलशाही किल्ले आपल्या ताब्यात घेतले. म्हणून शिवरायांचा बंदोबस्त करण्यासाठी आदिलशहाने फत्तेखानास रवाना केले. परिस्थिती फारच बिकट होती. एकीकडे आपले वडील कैदेत होते तर दुसरीकडे फत्तेखानाच्या स्वारीमुळे स्वराज्य धोक्यात येणार होते. महाराजांनी यावेळी लढाईसाठी पुरंदर किल्ल्याची जागा निवडली. मात्र यावेळी गड मराठ्यांच्या ताब्यात नव्हता. महादजी निळकंठराव यांच्या ताब्यात किल्ला होता. त्यांच्या भावाभावांमधील भांडणाचा फायदा उठवून महाराजांनी किल्ल्यात प्रवेश करण्यात यश मिळवले. या पुरंदर किल्ल्याच्या सहाय्याने मराठ्यांनी फत्तेखानाशी झुंज दिली आणि लढाई जिंकली. शिवाजी महाराजांना या पहिल्या लढाईतच मोठे यश प्राप्त झाले. सन १६५५ मध्ये शिवाजी राजांनी नेताजी पालकर यास गडाचा सरनौबत नेमले. वैशाख शु. १२ शके १५७९ म्हणजेच १६ मे १६५७ गुरुवार या दिवशी संभाजी राजांचा जन्म पुरंदरावर झाला.

शके १५८७ म्हणजेच १६६५ मध्ये मोगल सरदार जयसिंगाने पुरंदरला वेढा घातला. या युद्धाचे वर्णन सभासद बखरी मध्ये असे आढळते. -तेव्हा पुरंधरावरी नामजाद लोकांचा सरदार राजियाचा मुरारबाजी परभु म्हणून होता. त्याजबराबर हजार माणूस होते. याखेरीज किल्ल्याचे एक हजारे असे दोन हजारे लोक होते. त्यात निवड करून मुरारबाजी याने सातशे माणूस घेऊन ते गडाखाली दिलेरखानावरी आले. दिलेरखान तालेदार जोरावर पठाण पाच हजार याखेरीज बैल वैगरे लोक ऐशी फौज गडास चौतर्फा चढत होती. त्यात होऊन सरमिसळ जाहले. मोठे धोरंदर युद्ध जाहले. मावळे लोकांनी व खांसा मुरारबाजी यांनी निदान करून भांडण केले. पाचशे पठाण लष्कर ठार जाहले. तसेच बहिले मारले.° मुरारबाजी देशपांडे चे हे शौर्य पाहून दिलेरखान बोलिला, -अरे तू

कौल घे. मोठा मर्दाना शिपाई तुज नावजितो.° ऐसे बोलिता मुरारबाजी बोलिला -तुजा कौल म्हणजे काय? मी शिवाजी महाराजांचा शिपाई तुझा कौल घेतो की काय?° म्हणोन नीट खानावरी चालिला. खानावरी तलवरीचा वार करावा तो खानाने आपले तीन तीर मारून पुरा केला. तो पडला. मग खानाने तोंडात आंगोळी घातली, -असा शिपाई खुदाने पैदा केला.° खानाने वज्रगड ताब्यात घेतला आणि पुरंदरावर हल्ला केला व पुरंदर माचीचा ताबा घेतला. माचीवर खानाचे आणि मुरारबाजीचे घनघोर युद्ध झाले. मुरारबाजी पडला आणि त्याच बरोबर पुरंदरही पडला.

हे वर्तमान जेव्हा राजांना कळले तेव्हा त्यांनी जयसिंगाशी तहाचे बोलणे सुरू केले आणि ११ जून १६६५ साली इतिहास प्रसिद्ध -पुरंदरचा तह° झाला. यात २३ किल्ले राजांना मोगलांना द्यावे लागले. त्यांची नावे अशी, १. पुरंदर २. रुद्रमाळ किंवा वज्रगड ३. कोंढाणा ४. रोहीडा ५. लोहगड ६. विसापूर ७. तुंग ८. तिकोना ९. प्रबळगड १०. माहुली ११. मनरंजन १२. कोहोज १३. कर्नाळा १४. सोनगड १५. पळसगड १६.भंडारगड १७. नरदुर्ग १८. मार्गगड १९. वसंतगड २०. नंगगड २१. अंकोला २२. खिरदुर्ग (सागरगड)
२३. मानगड. ८ मार्च १६७० मध्ये निळोपंत मुजुमदाराने किल्ला स्वराज्यात आणला.

संभाजी राजांच्या मृत्यूनंतर किल्ला औरंगजेबाने जिंकला व त्याचे नाव -आजमगड° ठेवले. पुढे मराठांच्या वतीने शंकराजी नारायण सचिवांनी मोगलांशी भांडून पुरंदर घेतला. शके १६९५ मध्ये छत्रपती शाहू यांनी किल्ला पेशवे यांस दिला. अनेक दिवस किल्ल्यावर पेशव्यांची राजधानी होती. शके १६९७ मध्ये गंगाबाई पेशवे यांना गडावर मुलगा झाला, त्याचे नाव सवाई माधवराव ठेवण्यात आले. इ. स. १८१८ मध्ये इंग्रजांनी गड आपल्या ताब्यात घेतला.

# गडाचा फेरफटका

## १. बिनी दरवाजा:



पुरंदर माचीवरील हा एकमेव दरवाजा. आपण नारायणपूर गावातून किल्ल्यावर जातांना हा दरवाजा लागतो. दरवाजा आजही चांगल्या स्थितीत आहे. दरवाज्यातून आत शिरल्यावर पहारेक-यांच्या देवडा आहेत.
दरवाज्यातून आत शिरल्यावर समोरच पुरंदरचा खंदकडा आपले लक्ष वेधून घेतो. दरवाज्यातून आत शिरल्यावर दोन रस्ते लागतात, एक सरळ पुढे जातो तर दुसरा डावीकडे मागच्या बाजूस वळतो. आपण सरळ रस्त्याने पुढे गेल्यावर उतारावर लष्कराच्या बराकी आणि काही बंगले दिसतात. माचीची एकंदर लांबी एक मैल आहे, तर रुंदी १०० ते १५० फूट आहे. थोडे पुढे गेल्यावर उजवीकडे बालेकिल्ल्याच्या पायथ्याशी एक मंदिर दिसते त्याचे नाव°पुरंदरेश्र्वर°.

## २ पुरंदरेश्वर मंदिर:

हे मंदिर महादेवाचे आहे. मंदिरात इंद्राची सव्वा ते दीड फुटापर्यंतची मूर्ती आहे.
हे साधारणपणे हेमाडपंती धाटणीचे असावे.
थोरल्या बाजीरावाने या मंदिराचा जीर्णोद्धार केला.

**३. रामेश्र्वर मंदिर:** पुरंदरेश्र्वर मंदिराच्या मागील कोप-यात पेशवे घराण्याचे रामेश्र्वर मंदिर आहे. हे पेशव्यांचे खाजगी मंदिर होते. या मंदिराच्या थोडे वरती गेल्यावर पेशव्यांच्या दुमजली वाड्यांचे अवशेष दिसतात. पेशवाईच्या आरंभी बाळाजी

विश्र्वनाथाने तो बांधला. या वाड्यातच सवाई माधवरावांचा जन्म झाला. वाड्याच्या मागे विहीर आहे. आजही ती चांगल्या अवस्थेत आहे. येथून थोडे पुढे गेल्यावर दोन वाटा लागतात. एक वाट बालेकिल्ल्याच्या दिशेने वर जाते तर दुसरी खाली भैरवखिंडीच्या दिशेने जाते. आपण प्रथम बालेकिल्ल्याच्या दिशेने वर जाऊया. यावाटेने वर गेल्यावर १५ मिनिटातच आपण दिल्ली दरवाजापाशी पोहचतो.

**४ .दिल्ली दरवाजा:** दिल्ली दरवाजा: हा उत्तराभिमुख दरवाजा आहे. दरवाज्याच्या वळणावर श्री लक्ष्मी मातेचे देवालय आहे. दरवाजा ब-यापैकी सुस्थितीत आहे. या दरवाज्यातून आत गेल्यावर उजवी कडे आणखी एक दरवाजा दिसतो. डावीकडची वाट बालेकिल्ल्याच्या दुस-या टोकापर्यंत जाते. या वाटेने पुढे गेल्यावर काही पाण्याची टाकी लागतात. याशिवाय या भागात बघण्यासारखे काही नाही. आल्या मार्गाने दिल्ली दरवाज्यापाशी यावे. समोरच उजवी कडे असणा-या दरवाज्याने पुढे जावे. येथून पुढे गेल्यावर आणखी एक दरवाजा लागतो. या दरवाज्यावर दोन्ही बाजूस सिंहाच्या प्रतिकृती आढळतात.

**५. खंदकडा:** दिल्ली दरवाज्यातून आत शिरल्यावर डावीकडे एक कडा थेट पूर्वेकडे गेलेला दिसतो हाच तो खंदकडा. या कडाच्या शेवटी एक बुरूज आहे. बुरूज पाहून आल्यावर परत तीस-या दरवाज्यापाशी यावे. येथून एक वाट पुढे जाते. वाटेतच आजुबाजूला पाण्याची काही टाकी लागतात. थोडे पुढे गेल्यावर उजवीकडे एक उंचवटा लागतो. त्याच्या मागे पडक्या जोत्यांचे अवशेष आहेत. येथेच अंबरखाना असल्याचे अवशेष दिसतात. थोडे वर चढून पाहिल्यास वाडाचे अवशेष दिसतात. हे सर्व पाहून पुन्हा आपल्या वाटेला लागावे. वाटेवरून पुढे गेल्यावर काही पाण्याचे हौद लागतात. या वाटेवरून पुढे जातांना एक वाट डावीकडे खाली गेली आहे. या वाटेवरून खाली गेल्यावर केदार दरवाजा लागतो. पडझडी मुळे आज हा दरवाजा वापरात नसला तरी पूर्वी या दरवाजाला फार महत्त्व होते.

**६ .पद्मावती तळे:** मुरारबाजींच्या पुतळ्या पासून थोडे पुढे गेल्यावर पद्मावती तळे लागते.

**७. शेंद-या बुरूज:** पद्मावती तळ्याच्या मागे बालेकिल्ल्याच्या वायव्येस, तटबंदीच्या बरोबरीने एक बुरूज बांधला आहे त्याचे नाव शेंद-या बुरूज.

**८. केदारेश्र्वर:** २० मिनिटात केदार दरवाजा पाहून आपण आपल्या मूळ वाटेला लागू शकतो. यावाटेने १५ मिनिटे चालून गेल्यावर काही पायया लागतात. त्या आपल्याला थेट केदारेश्र्वराच्या मंदिरा पर्यंत घेऊन जातात. पुरंदरचे मूळ दैवत म्हणजे केदारेश्र्वर. मंदिराचा जीर्णोद्धार केलेला आहे. महाशिवरात्रीला हजारो भाविक याच्या दर्शनाला येतात. मंदिराच्या समोरच एक दगडी दीपमाळ आहे. सभोवती दगडी फरसबंदी आहे. केदारेश्र्वराचे मंदिर म्हणजे किल्ल्यावरील अत्युध भाग. येथून राजगड, तोरणा, सिंहगड, रायरेश्र्वर, रोहीडा, मल्हारगड, कहेपठार हा सर्व परिसर दिसतो. या केदार टेकडीच्या मागे एक बुरूज आहे त्याला कोकण्या बुरूज असे नाव आहे.

**९. पुरंदर माची:** आल्या वाटेने माघारी फिरून दिल्ली दरवाज्यातून जाणा-या वाटेने थेट पुढे यावे. म्हणजे आपण माचीवरील भैरवखिंडीत जाऊन पोहचतो. वाटेत वाडांचे अनेक अवशेष दिसतात.

**१०. भैरवखिंड:** याच खिंडीतून वज्रगडावर जाण्यासाठी वाट आहे. खिंडीत शिवाजी महाराजांचा पुतळा आहे. या खिंडीपर्यंत गाडी रस्ता आलेला असल्याने त्या रस्त्यावरून चालत गेल्यावर वाटेतच उजवीकडे राजाळे तलाव लागतो. सध्या पुरंदरमाचीवर याच तलावाचे पाणी वापरले जाते.

## ११. वीर मुरारबाजी पुतळा:


बिनीदरवाजातून आत शिरल्यावर
उजवीकडे गेल्यावर समोरच
वीर मुरारबाजीचा पुतळा दिसतो.
इ.स. १९७० मध्ये हा पुतळा उभा केला आहे.



**१२. वज्रगड:** वज्रगड हा डोंगर स्वतंत्र असला तरी पुरंदरला जोडून असल्यामुळे त्याकडे बरेचदा पुरंदरचा विस्तारित भाग म्हणूनही पाहिले जाते. वज्रगडाचे दुसरे नाव म्हणजे 'रूद्रमाळ'. पुरंदरच्या माचीपेक्षा वज्रगडाची उंची अधिक असल्यामुळे पुरंदर जिंकता येत नाही हे पाहून दिलेरखानाने १६६५ च्या पुरंदरच्या ऐतिहासिक लढाईमध्ये आधी वज्रगड जिंकण्याचा निर्णय घेतला होता. वज्रगड ताब्यात आल्यावर त्यावरून पुरंदरच्या माचीवर तोफगोळ्यांचा मारा करणे त्याला सोपे गेले. अर्थात, त्यानंतरही पुरंदर अजिंक्यच राहिला.

वज्रगडावर पाहण्यासारखे फारसे काही नाही. एक दरवाजा, व पाच फूटी गदाधारी हनुमानाचे मंदिर व एक टाके एवढ्यात वज्रगड संपतो. गडावरील अवाढव्य शिळा लक्ष वेधून घेतात.

# नकाशा




# ट्रेकसाठी उपयुक्त टिप्स:
# (अर्थात knowledge Transfer )

ट्रेक म्हटलं की उमेदीच्या पहिल्या काही वर्षांतला बराचसा वेळ सॅक भरण्यातच जातो. मला आठवतंय, माझ्या एका मित्राने एका ट्रेकला चक्क बादली आणली होती! खायला, चघळायला काय घ्यावं इथपासून कपडे, शूज कोणते घालावेत, आयत्यावेळेला उपयोगी पडतील अशी साधने कोणती, रानामधल्या वनस्पती-झाडांचे ट्रेकमधले उपयोगी गुणधर्म याबद्दल माहिती देणारा लेख आपण "दुर्ग दुर्गट भारी"मध्ये

कायमस्वरूपी प्रकाशित करणार आहोत. पुढच्या वेळी निघताना याची एक प्रिंट घेऊन ठेवा की झालं!

सुरूवात करूया अगदी प्राथमिक टिप्स पासून, लवकरच आपण त्यांची सुधारित आवृत्ती प्रसिद्ध करणार आहोत -

१) ज्या किल्ल्यावर जाणार असाल तिथल्या वाटा, आजूबाजूच्या भूभागाची माहिती, चढायला लागणारा वेळ, राहण्याची सोय याची माहिती गोळा करा आणि घरच्यांनाही देऊन ठेवा. ( 127 hrs आठवतोय ना? ;))

२) प्रमाण नकाशे मिळालेच तर प्रिंट घेऊन जा. वाटा शोधण्यात त्यांचा खूप उपयोग होतो.

३) आपल्याला संपूर्ण वेळ उचलता येईल इतपतच सॅक भरा. आवश्यक त्याच गोष्टी सॅकमध्ये असाव्यात. उदा, ज्या पातेल्यात चहा करायचा त्यातच तांदूळ भिजवता येतील, अथवा एकच ताट झाकण म्हणूनही ठेवता येईल आणि तांदूळ धुवायला सुद्धा वापरता येईल.

४) कुठल्याही ट्रेकमध्ये टॉर्च, काडेपेटी, (मुक्कामी/नाईट ट्रेकमध्ये मेणबत्त्या) चाकू, (स्विस नाईफ असल्यास उत्तम), रद्दी पेपर, दोर, या गोष्टी घ्याच.

५) पायामध्ये ग्रिप असणारे शूज आवश्यक. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, चढण-उतरण शूजच्या नव्हे तर आपल्या पायांच्या बळावर करणार आहोत हे ध्यानात ठेवावे. त्यामुळे आत्मविश्वासाने पाऊल टाकणेही आवश्यक आहे. पण तरीही, निसरड्या, उभट भूभागावर शूज अतिरिक्त मदत देतात.

६) मुक्कामी ट्रेकमध्ये झोपण्यासाठी कॅरीमॅट उत्तम! वजनाला हलक्या, आटोपशीर असतात.

७) जेवण शिजवून खाण्याची वेळ आल्यास ट्रेकची मजा अजून वाढते. बाहेर पाऊस कोसळतोय, गुहेमध्ये चुलीचा सगळा धूर भरून राहिलाय, अंधारात, टॉर्चच्या प्रकाशात जेवण शिजतंय, त्याचा घमघमाट भूक चाळवतोय, पातेली कुणी घासायची यावर एका बाजूला वाटाघाटी सुरू आहेत.. अर्थात हल्ली रेडी टू कूक ची पॅकेट्स उपलब्ध असतात.

नसल्यास पोहे, मॅगी, डाळ/पिठलं-भात. मुगाच्या डाळीची खिचडी हे पदार्थ भूकही भागवतात आणि कमी वेळात तयारही करता येतात. फावल्या वेळात चघळण्यासाठी खजूर, बिस्कीटे, चिक्की सुद्धा घेऊन ठेवा. जांभळे, करवंदांच्या मोसमातला ट्रेक असेल तर मग काय वर्णावी धम्माल महाराजा?

८) प्रत्येकाकडे किमान एक मोठी बाटली पाणी असणे आवश्यक. उन्हाळ्यात २ सुद्धा कधीकधी पुरेनाशा होतात. शिवाय बाटलीचा आपत्कालिन परिस्थितीत 'दाना'साठीही उपयोग होतो तो वेगळाच! :)

९) आपल्या आजारांबद्दल, ऐलर्जीबद्दल प्रत्येकाला माहिती असतेच. त्यानुषंगाने औषधे बरोबर ठेवा. एसटी लागणे, उन्हात फिरल्यास पित्त वाढणे, गवत-झाडीतून फिरल्यास रॅशेस उठणे इ त्रासांना नेहमीच टाळता येणं शक्य नसलं तरी उपाय करता येतात. सर्वासाधारणपणे एक फ़र्स्ट-एड बॉक्स एकाकडे असावा. त्यात ताप-सर्दी-पित्त यावरच्या गोळ्या, भाजल्यास-खरचटल्यास लावायचे मलम, कापूस, बॅंडेज, सोबतीला छोटी कात्री, दोरा, कोरडी फडकी इ साहित्य ठेवावे. ट्रेकमध्ये जबाबदारीने वागल्यास अपघात टाळता येतात हे खरेच. तरीही खबरदारी म्हणून ही औषधे!

१०) सर्वात शेवटी सर्वात महत्त्वाचे, ट्रेकमध्ये निसर्गाला, रानातल्या पशु-पक्ष्यांना, त्यांच्या अधिवासाला धक्का पोहोचेल असे कुठलेही कार्य करू नका. रात्री गोंधळ, गोंगाट, मद्यपान करून धिंगाणा करणे या गोष्टींसाठी ऐतिहासिक किल्ल्यांपेक्षा इतर उत्तम जागा या जगात भरपूर आहेत. दरीतून येणारा वाऱ्याचा आवाज, पक्ष्यांची मंजूळ किलबिल, उन्ह-पावसाचे खेळ, आणि यातलं काहीच नसेल तरी निखळ आणि नितळ शांतता यातलंही सौंदर्य अनुभवण्यासारखं असतं!

तसेच अशा ऐतिहासिक ठिकाणी स्वत:ची नावे लिहून येण्यासारखा नामर्दपणा दुसरा नाही. दस्तुरखुद्द शिवछत्रपतींचे नाव एकाही गडावर त्यांनी लिहिले अथवा लिहून घेतलेले नाहीये ही गोष्ट पुरेशी सूचक नाही का?
ट्रेकींगच्या आनंददायी अनुभवासाठी डोंगरभर शुभेच्छा!

# ऋणनिर्देश

१. नकाशा: www.trekkshitz.com
२. अक्षांश-रेखांश संदर्भ: wikipedia.org
३. मराठी विकीपिडीया
४. साद सह्याद्रीची भटकंती किल्ल्यांची - प्र. के. घाणेकर
५. डोंगरयात्रा - आनंद पाळंदे
६. सांगाती सह्याद्रीचा - यंग झिंगारो

# आवाहन

## दोस्त !

हा नवीन उपक्रम कसा वाटला ते आम्हाला जरूर कळवा. तसेच आपल्या ट्रेकसाठी या महितीचा आपल्याला कसा उपयोग झाला तेही जाणून घ्यायला आम्हाला आवडेल. यात अजून काय आणि कशी सुधारणा करता येईल तेही सांगा. तुम्हाला अशी एखाद्या गडाची ओळख करून द्यायला आवडेल ?

या गडाबद्दल किंवा बृहन्महाराष्ट्रातल्या कोणत्याही गड किल्ल्याबाबत आपणाकडे माहिति फ़ोटो असल्यास कृपया आमच्याशी संपर्क साधा. पुस्तिकांची ही मालिका अधिकाधिक समृद्ध होण्यासाठी आपली मदत हवी आहे. तसेच गडकिल्ल्यांशी संबंधित काम करणारा आपला काही ग्रुप वगैरे असल्यास आम्हाला आपली माहिती कळवा. आपला किंवा आपल्या माहितीतल्या कुणाचा ब्लॉग, वेबसाईट यांचीही लिंक पाठवा. निवडक दर्जेदार लेखन आम्ही आपल्या नावासहित प्रसिद्ध करू.

आज इवलिसी दिसणारी ही पुस्तिका कालांतराने एक संदर्भ ग्रंथ बनावी अशी इच्छा आणि योजना आहे. आणि हे आपल्या मदतीशिवाय अशक्य आहे.

आपल्या सर्व प्रकारच्या प्रतिसादांसाठी लिहा

durgabhari@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठानच्या या पूर्वी प्रसिद्ध झालेल्या ई पुस्तकांसाठी भेट द्या

www.esahity.com

ई साहित्य प्रतिष्ठान

ही पुस्तिका तुम्हाला कशी वाटली ? एकूणच हा उपक्रम तुम्हाला आवडला का ? मग तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानबद्दल जाणून घ्यायला नक्कीच आवडेल.

२००८ मध्ये स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना जवळ जवळ दोनशे दर्जेदार मराठी ई पुस्तके / नियतकालिके विनामूल्य दिली आहेत. मोरया, मीरा, कृष्णा, गुरुदेव रविंद्रनाथ, स्वा. विवेकानंद, विंदा करंदिकर, ना धों महानोर, ग्रेस , नारायण सुर्वे, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज असे एकाहून एक सरस विषय आम्ही घेतले. सुमारे चारशे नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर केले. आमचा प्रत्येक अंक, आमचे प्रत्येक पुस्तक ई मेलच्या माध्यमातून साधारणतः सव्वालाख मराठी वाचकांपर्यंत जातो. जगभरात पसरलेल्या पण मनाने महाराष्ट्रातच असणार्या प्रत्येक वाचकापर्यंत जाण्याचा आमचा प्रयत्न आहे. आम्ही इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. प्रेम आणि सौंदर्याबरोबरच विद्यार्थी आणि शेतकर्यांच्या आत्महत्या, दहशतवाद, प्रेमभंगातून येणारी निराशा अशा ज्वलंत विषयांवरचं साहित्य मांडलं. विनोदाला वाहिलेलं ई श्टाप देऊन हसवलं. लहान मुलांसाठी बालनेटाक्षरीची निर्मिती केली. शास्त्रीय संगीताची समज तरुणांत येण्यासाठी संगीत कानसेनचे ई वर्ग चालवले. नव्या कवींसाठी एक भक्कम व्यासपीठ म्हणजे नेटाक्षरी चालवले. तर महाराष्ट्रातल्या किल्ल्यांची माहिती देणार्या पुस्तिकांच्या "दुर्ग दुर्गट भारी" या मालिकेद्वारे महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगभरातल्या मराठी मंडळींना मराठमोळ्या इतिहासाची उभारी दिली. लवकरच आमचा ई-यत्ता हा ज्ञानवेध घेणारा उपक्रम सुरू होईल. मराठीचं वैभव जे ज्ञानदेव तुकाराम. अशा संतांच्या पुस्तिकांची एक मालिका आपल्या भॆटीला येईल. केवळ कविताच नव्हे तर कथा कादंबर्या आणि गंभीर विषयांवरची पुस्तकेही आपल्याला इथे मिळतील. तर तरुणांमध्ये नव्या जगाला सामोरं जाण्याची हिंमत जागवणारं "उनाड" लवकरच आपल्या भॆटीला येणार आहे.